उत्तरांच्या शोधात

समाजभान अभियान

# लोकसहभागाचं छोटंसं पाऊल

कौस्तुभ आमटे

▶ पुण्यामध्ये गेल्या नोव्हेंबर महिन्यात 'आनंदवन महोत्सव' पार पडला. आनंदवन म्हणजे कुष्ठकार्य, एवढीच ओळख जनमानसात रुजलेली आहे. प्रत्यक्षात गेल्या ६७ वर्षांत शेती, जलसंधारण, पर्यावरण, उद्योग, शिक्षण, आरोग्य, रोजगारनिर्मिती, घरबांधणी इ. अनेक क्षेत्रांत नानाविध प्रयोग करून अफाट आणि पायाभूत काम आनंदवनात उभं राहिलं आहे. विशेष म्हणजे समाजाने नाकारलेल्या साध्यासुध्या माणसांच्या कष्टातून हा चमत्कार घडला आहे. आनंदवनाची हीच प्रयोगशील ओळख समाजापुढे यावी, तसंच 'आनंदवना'मार्फत महाराष्ट्रातील दुष्काळी प्रदेशांत सुरू असलेल्या विविध समाजोपयोगी उपक्रमांची माहिती लोकांपर्यंत पोहोचावी, हा 'आनंदवन महोत्सवा'च्या आयोजनामागचा उद्देश होता.

महोत्सव झाल्यानंतर पुण्यातील अनेक लोकांनी आमच्याशी संपर्क साधला आणि आपल्या हाउसिंग सोसायटीमध्ये 'आनंदवन महोत्सवा'प्रमाणे एखादं छोटेखानी प्रदर्शन मांडावं असं सुचवलं. महोत्सवाला येऊ न शकलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्याची ही कल्पना आम्हालाही भावली. या 'मिनी-आनंदवन महोत्सवा'चं स्वरूप, आनंदवनाच्या प्रवासाचं फोटो प्रदर्शन, आनंदवननिर्मित वस्तूंचं प्रदर्शन-विक्री आणि आनंदवनाने नव्याने सुरू केलेल्या 'आनंदवन समाजभान अभियान' आणि 'स्त्रीषु' या उपक्रमांची माहिती असं असावं असं ठरलं. 'आनंदवन समाजभान अभियानां'तर्गत आम्ही हाती घेतलेले नवनवीन उपक्रम जितके जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचतील तितका या कामांसाठी आवश्यक लोकसहभाग उभा करता येईल असं आम्हाला वाटतं. शेती, पाणी, रोजगारनिर्मिती, आरोग्य, शिक्षण आदी मूलभूत क्षेत्रांतील प्रश्नांचा आवाकाच इतका मोठा आहे की यात लोकांच्या सहभागाची, कौशल्याची आणि प्रयत्नांची प्रचंड गरज आहे. समाजातील समस्या आणि त्यांचं नेमकं स्वरूप समाजापुढे यावं यासाठी 'आनंदवन समाजभान अभियाना'ने लोकसहभागाचं हे छोटंसं पाऊल उचलण्याचं ठरवलं आहे.

**थेंबे थेंबे तळे साचे**

बाबा आमटे नेहमी म्हणत, की कोणतंही काम हाती घेण्यापूर्वी समस्येची सखोल माहिती आणि त्या समस्येचं निराकरण करण्याच्या मार्गाचं ज्ञान असणं आवश्यक आहे. ही पूर्वतयारी म्हणजे अभावाचं बारकाईने आणि वस्तुनिष्ठपणे केलेलं निरीक्षण, जेणेकरून समस्या अधिकाधिक स्पष्ट होईल. पुष्कळदा गरजांचा आणि त्यावरील उपायांचा सखोल अभ्यास न केल्याने केल्या गेलेल्या उपाययोजना शाश्वत ठरत नाहीत, असं बाबांचं म्हणणं होतं.

बाबांच्या याच विचारांची कास धरून पाणी या विषयाचा सर्वंकष आणि शास्त्रशुद्ध अभ्यास केल्यावरच कामाचा श्रीगणेशा करावा असं आम्हाला वाटलं. मागील लेखात लिहिल्याप्रमाणे महाराष्ट्राला सतत भेडसावणारी पाणीटंचाई आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या लक्षात घेऊन नजीकच्या काळात शास्त्रशुद्ध प्रयोगांची कास धरत समाजभान अभियान 'भूजल व्यवस्थापन आणि जलसाक्षरता' असा अभिनव उपक्रम हाती घेत आहे. 'ॲक्वाडॅम' या संस्थेने पुण्यामध्ये दोन दिवसांचं भूजल व्यवस्थापन प्रशिक्षण आयोजित केलं आहे. समाजभान अभियानाची टीम, तसंच नाम फाउंडेशन या प्रशिक्षणात सहभागी होत आहेत. एक दिवस क्लासरूम ट्रेनिंग आणि एक दिवस फील्ड ट्रिप असं या प्रशिक्षण कार्यक्रमाचं स्वरूप असेल.

ॲक्वाडॅमच्या मार्गदर्शनाखाली भूजल व्यवस्थापन या विषयाचा समूळ अभ्यास करून 'लोकेशन स्पेसिफिक' आणि 'नीड बेस्ड' ॲप्रोचने गावखेड्यांत शाश्वत उपाययोजना राबवण्याच्या दिशेने समाजभान अभियानाची वाटचाल सुरू झाली आहे.

■ कौस्तुभ विकास आमटे
९९२२५५०००६
kvamte@gmail.com

## 'प्रकृती'सोबतची वाटचाल

▶ विदर्भातील 'प्रकृती' संस्थेच्या सुवर्णाताई दामले यांनी मार्चच्या पहिल्या आठवड्यात आनंदवनाला भेट दिली. प्रकृतीशी जोडलेल्या अकोला जिल्ह्यातील महिला बचतगटांना आनंदवनात डेअरी उद्योगाचं निवासी प्रशिक्षण देण्यासंदर्भात याआधी त्यांच्याशी चर्चा झाली होती. त्या अनुषंगाने साधारण एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात या महिला आनंदवनात दाखल होणार आहेत. 'प्रकृती'मार्फत आनंदवनात इलेक्ट्रिकल फिटिंग व प्लंबिंग आणि इलेक्ट्रिकल मोटर रिवाइंडिंगचं निवासी प्रशिक्षण घेत असलेल्या आळंदा (रुस्तमाबाद) या अकोला जिल्ह्यातील गावच्या तरुणांचीही त्यांनी भेट घेतली आणि प्रशिक्षणाचा आढावा घेतला. रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने अजून कुठली पावलं उचलता येतील याविषयी सुवर्णाताईंशी विस्ताराने चर्चा झाली. शिवाय, ॲक्वाडॅमच्या सोबतीने सुरू असलेल्या भूजल व्यवस्थापन या विषयातील कामासंदर्भातही चर्चा झाली. आनंदवनाचे विश्वस्त सुधाकर कडू लवकरच सुवर्णाताईंसोबत अकोला जिल्ह्यातील काही गावांचा दौरा करणार आहेत. त्यानंतर कामाच्या पुढील वाटचालीचं स्वरूप ठरेल.